स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा - वर्धा महाराष्ट्र

ईमेल - sdmhinganghat@gmail.com
दुरध्वनी क्र.- 07153-244080

**जाहीरनामा जाहीरात क्र.** मह. सहा. / पो.पा./कावि- 379 /2023 दिनांक - 26/06/2023

## हिंगणघाट, उपविभागातील रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत

वर्धा जिल्हयातील हिंगणघाट उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील (हिंगणघाट व समुद्रपुर तालुका) गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात फक्त ऑनलॉईन पध्दतीने https://hinganghat.ppbharti.in या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | 26/06/2023 |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 07/07/2023 |
| 3 | पात्र /अपात्र उमेदवारांचे अर्जाची छाननी करून यादी प्रसिद्ध करणे ( उपविभागीय स्तरावर) | 08/07/2023 |
| 4 | पात्र/अपात्र उमेदवाराचे यादीवर आक्षेप व निराकरण करणे (उपविभागीय स्तरावर) सायंकाळी ४.०० वाजता | 11/07/2023 |
| 5 | पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र निर्गमीत करणे (उपविभागीय स्तरावर) | 13/07/2023 ते 20/07/2023 (ऑनलाईन पदध्तीने ) |
| 6 | परीक्षेचा दिनांक | 22/07/2023 (जिल्हास्तरावर ) |
| 7 | लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करणे | 22/07/2023 (जिल्हास्तरावर ) |
| 8 | पात्र उमेदवाराची तोंडी परीक्षा घेणे (उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगणघाट) | 25/07/2023 हिंगणघाट तालुका<br>26/07/2023 समुद्रपुर तालुका |
| 9 | अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे (उपविभागीय स्तरावर) | 27/07/2023 |

**परिक्षा शुल्क खालील प्रमाणे विहित पध्दतीने भरावे लागेल.**

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग | - **रुपये 500/-** | संकेतस्थळावर अर्ज भरतांना त्याच वेळी परिक्षा शुल्क ऑनलाईन अदा करणे बंधनकारक राहील. |
| आरक्षीत / आर्थीक दुर्बल घटक प्रवर्गासाठी | - **रुपये 300/-** | |



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

सरळसेवा भरती प्रक्रीयेची सविस्तर जाहीरात https://hinganghat.ppbharti.in आणि www.wardha.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपुर्ण प्रक्रीया काळजीपुर्वक समजून ऑनलॉईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परिक्षेचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची स्थळप्रत कागदपत्राच्या साक्षांकीत प्रतीसह परिक्षा फिच्या उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगणघाट यांचे खात्यामध्ये यशस्वीरित्या जमा झाल्याबाबतची पावती व विहित परिक्षा शुल्क असलेले अर्ज दिनांक 07/07/2023 पर्यत सायंकाळी 05.00 पर्यंत सादर करावा.इतर कोणत्याही प्रकारे परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही.प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावर विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील, सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रदद करणे, अंशत: बदल करणे पदाच्या एकुण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी उपविभागीय दंडाधिकारी, हिंगणघाट यांनी राखून ठेवले असून त्याचा निर्णय अंतिम असेल याची सर्वानी नोंद घ्यावी. हिंगणघाट उपविभागातील पोलीस पाटीलांची मंजूर पदे, रिक्त पदे, तसेच 30% महिलांसाठी आरक्षित ठेवलेली पदे विचारात घेवून सद्यस्थितीत जी पदे भरणे आवश्यक आहे.त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

विविध प्रवर्गाच्या आरक्षणासाठी खालीलप्रमाणे गावे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशनचे नाव | तालुका | गावाचे नाव | आरक्षणाची प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | समुद्रपूर | समुद्रपूर | कोरी | अनु. जाती | महिला राखीव |
| 2 | सिंदी रेल्वे | समुद्रपूर | भोसा | अनु. जाती | महिला राखीव |
| 3 | सिंदी रेल्वे | समुद्रपूर | जेजुरी | अनु. जाती | महिला राखीव |
| 4 | गिरड | समुद्रपूर | सावंगी | अनु. जाती | |
| 5 | हिंगणघाट | हिंगणघाट | गोविंदपूर | अनु. जाती | |
| 6 | हिंगणघाट | हिंगणघाट | खैराटी | अनु. जाती | |
| 7 | दहेगाव | समुद्रपूर | देरडा | अनु. जाती | महिला राखीव |



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | गिरड | समुद्रपूर | वडगाव | अनु. जाती | |
| 9 | सिंदी रेल्वे | समुद्रपूर | धानोली (साकुर्ली) | अनु. जाती | महिला राखीव |
| 10 | वडनेर | हिंगणघाट | बोंदूर्णी | अनु. जमाती | महिला राखीव |
| 11 | समुद्रपूर | समुद्रपूर | सुलतानपूर | अनु. जमाती | |
| 12 | समुद्रपूर | समुद्रपूर | वायगाव गोंड | अनु. जमाती | |
| 13 | गिरड | समुद्रपूर | धामनगाव गाठे | अनु. जमाती | महिला राखीव |
| 14 | समुद्रपूर | समुद्रपूर | दहेगाव | अनु. जमाती | |
| 15 | वडनेर | हिंगणघाट | ढिवरी पिपरी | वि. जा. अ | |
| 16 | अल्लीपूर | हिंगणघाट | कोसूर्ला लहान | वि. जा. अ | |
| 17 | हिंगणघाट | हिंगणघाट | सातेफळ | वि. जा. अ | |
| 18 | समुद्रपूर | समुद्रपूर | सेवा | भ.ज.( ब ) | |
| 19 | अल्लीपूर | हिंगणघाट | कात्री | भ. ज. (क ) | |
| 20 | वडनेर | हिंगणघाट | सावंगी संगम | भ. ज. (क ) | |
| 21 | गिरड | समुद्रपूर | उसेगाव | भज. (क) | |
| 22 | वडनेर | हिंगणघाट | टेंभा | भज (ड) | |
| 23 | वडनेर | हिंगणघाट | आर्वी छोटी | भज (ड) | |
| 24 | वडनेर | हिंगणघाट | बांबर्डा | भज (ड) | |
| 25 | हिंगणघाट | हिंगणघाट | सावंगी हेटी | विमाप्र | |
| 26 | अल्लीपूर | हिंगणघाट | भैय्यापूर | विमाप्र | महिला राखीव |



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 27 | वडनेर | हिंगणघाट | पिपरी | विमाप्र | |
| 28 | सिंदी रेल्वे | समुद्रपूर | खुनी | इ.मा. व. | |
| 29 | समुद्रपूर | समुद्रपूर | महागाव (जुने) | इ.मा. व. | |
| 30 | समुद्रपूर | समुद्रपूर | सावंगी देर्डा | इ.मा. व. | महिला राखीव |
| 31 | गिरड | समुद्रपूर | नारायणपूर (झो) | इ.मा. व. | |
| 32 | समुद्रपूर | समुद्रपूर | बेलघाट | इ.मा. व. | महिला राखीव |
| 33 | सिंदी रेल्वे | समुद्रपूर | उमरा | इ.मा. व. | महिला राखीव |
| 34 | समुद्रपूर | समुद्रपूर | सुकळी बर्फा | इ.मा. व. | महिला राखीव |
| 35 | गिरड | समुद्रपूर | गणेशपूर | इ.मा. व. | |
| 36 | समुद्रपूर | समुद्रपूर | जीरा उमरी | इ.मा. व. | महिला राखीव |
| 37 | हिंगणघाट | हिंगणघाट | कडाजना | इ.मा. व. | महिला राखीव |
| 38 | वडनेर | हिंगणघाट | भिवापूर | इ.मा. व. | |
| 39 | समुद्रपूर | समुद्रपूर | नंदोरी | आथिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 40 | वडनेर | हिंगणघाट | दारोडा | आथिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 41 | हिंगणघाट | हिंगणघाट | वेळा | आथिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 42 | वडनेर | हिंगणघाट | येरणगाव | आथिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 43 | वडनेर | हिंगणघाट | गांगापूर | आथिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 44 | समुद्रपूर | समुद्रपूर | मेंढुला | आथिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 45 | गिरड | समुद्रपूर | नारायणपूर | आथिक दृष्टया दुर्बल घटक | महिला राखीव |

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 46 | हिंगणघाट | हिंगणघाट | इंझाळा | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | महिला राखीव |
| 47 | दहेगाव | समुद्रपूर | नांद्रा | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | महिला राखीव |
| 48 | समुद्रपूर | समुद्रपूर | गव्हा | खुला | |
| 49 | हिंगणघाट | हिंगणघाट | मुरादपूर | खुला | |
| 50 | हिंगणघाट | हिंगणघाट | कोपरा | खुला | |
| 51 | गिरड | समुद्रपर | धोंडगाव | खुला | महिला राखीव |
| 52 | गिरड | समुद्रपूर | पिंपळगाव (लोखंडी) | खुला | महिला राखीव |

<u>**पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता :-**</u>

1) अर्जदार हा दहावी (एस. एस. सी) उत्तीर्ण असावा.
2) (अ) वयोमर्यादेकरीता अर्जदाराचे दिनांक 26/06/2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
   (ब) अर्जदाराचे वय दिनांक 26/06/2023 रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.
   (क) पोलीस पाटील पदांकरीता वयोमर्यादा शिथिलक्षम नाही.
3) अर्जदार हा स्थानिक व कायम रहिवाशी असावा. **अर्जदाराने राशन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधार कार्ड, ज्या पुराव्याने स्थानिक व कायम रहिवासी असल्याचे सिध्द होते असा कोणताही एक पुरावा मुलाखतीचे वेळी सादर करावा.**
4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चे ई-मेल व WhatsApp नंबर नमूद करावे.
5) अर्जदार शारीरिकदृष्टया **सक्षम असावा** व अर्जदाराचे **चरित्र्य निष्कलंक असणे आवश्यक** आहे.
6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)
7) प्रवर्ग निहाय आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक.
8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब, क, ड या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2022-23 या कालावधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.
9) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब, क, ड या प्रवर्गातील महिला पदांसाठी अर्ज करणा-या अर्जदार यांना सन 2022-23 या कालावधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रम. पत्र आवश्यक राहील.

10) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) करीता आरक्षीत जागेकरीता तहसिलदार यांनी निर्गमित केलेला आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**परिक्षेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परिक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा(मुलाखत) | एकुण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल .
2. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती व चालु घडामोडी इत्यादी विषयांचा समावेश असेल.
4. लेखी परिक्षेत एकुण 80 गुणापैकी किमाण 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी **फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा** लागेल.

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस शैक्षणिक पात्रता व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयाव्या लागतील. अन्यथा तोंडी परिक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

2) लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क कागदपत्रांच्या आधारे परिपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रदद होवू शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादीसारख्या सवलती नामंजुर करण्यात येतील. याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

3) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकिय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.

4) अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

5) अर्जदारांचे कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा. अथवा पुर्णवेळ नोकरी करणारा नसावा याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

6) पोलीस पाटील पदांवरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती ) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक / समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.

7) अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

8) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातुन केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

9) प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकिय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)

10) हिंगणघाट उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल.

11) संपुर्ण भरती प्रक्रीया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

12) पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.



Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

13) पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारीरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागु करण्यात आलेले नाही.

14) पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागु होत नाहीत.

15) **महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8 ) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे** (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा. प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे दिनांक 31/03/2023 पर्यंत अथवा चालु आर्थीक वर्षातील वैध असलेले नॉन क्रिमीलेअर सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर मागास प्रवर्गाना लागू राहील.

16) शासन, महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.82/ 2001/मसेआ/2000/प्र.क्र.412/ का-2 दिनांक 25/05/2001 आणि तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब, क, ड प्रवर्गातील महिला आरक्षणाअंतर्गत अर्ज करणा-या महिला अर्जदारांनी सन 2022-23 या कालावधी करीता दिनांक 31/03/2023 पर्यन्त अथवा चालु आर्थीक वर्षातील वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र /कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

17) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र. एसआरव्ही – 2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

18) लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदांवरील निवडीकरीता पात्र राहील.

19) समान गुण मिळाल्यास अंतिम निवड शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र. 592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

1) पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर
2) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर
3) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर
4) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार

पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश, त्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.

20) याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुद्धा बंधनकारक असतील.

21) हा जाहीरनामा/जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकाराचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत. असे समजण्यात येईल.

22) परीक्षा शुल्क (D.D. द्वारे) भरणा न करण्यात आलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

## ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत :-

1. प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही. उमदेवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रीयेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल वहनात येणा-या तांत्रिक अडचणीना उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील.
2. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज https://hinganghat.ppbharti.in या वेबसाईटद्वारे सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.
3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील व याबाबत



Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

उमेदवारांस कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

4. अर्जदार यांनी फार्म भरतांना गावाचे नाव, आरक्षण, याची खात्री करुन अर्ज भरावे.अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील.
5. स्वत:चा अद्यावत विहीत पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन https://hinganghat.ppbharti.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना फोटोची व सहीची प्रत्येकी साईज 35 केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.
6. उमेदवारांची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतही हक्क राहणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार पोलीस पाटील पदभरती निवड समिती कडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार येणार नाही.
7. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सुचना https://hinganghat.ppbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
8. उमेदवाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतांना जाहिरात डाऊनलोड करुन काळजीपुर्वक वाचावी.
9. अर्जदाराने फोटो आणि स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावे. फोटो 35 केबीपेक्षा कमी असावा आणि स्वाक्षरी 35 केबीपेक्षा कमी असावी.
10. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपुर्ण भरुन भरलेल्या उमेदवाराची स्थिती / परिक्षा प्रवेशपत्र /वेळापत्रक/परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल.यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील
11. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर https://hinganghat.ppbharti.in या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.
12. लेखी परीक्षा झाल्यावर दोन तासाने आदर्श उत्तरपत्रिका प्रकाशित केली जाईल. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये कोणताही **प्रश्न चुकीचा आढळल्यास लेखी परिक्षेच्या दिवशी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत त्याबाबत लेखी आक्षेप जिल्हास्तरीय प्रश्नपत्रिका समिती यांचेकडे नोंदवावे. याबाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.**



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

13. उमेदवाराने ज्या दिनांकास अर्ज भरला आहे त्या अर्जाचा प्रिंटआऊट कॉपी व त्यासोबत शैक्षणिक अर्हतेचे व अन्य संबधित पदाकरीता आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायाकिंत प्रती स्वसाक्षाकिंत प्रतीसह ऑनलाईन अर्ज भरल्याच्या दिनांकास किंवा लगतच्या दिनांकाच्या दिवशी अंतिम मुदतीपुर्वी उपविभागीय दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करणे बंधनकारक राहील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

14. प्रवेशपत्र पोष्टाने पाठविले जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी. उमेदवाराने स्वत: विहित वेळेत आपले प्रवेशपत्र (Hall ticket) डाऊनलोड करुन प्रिंट करावी.

दिनांक :- 26/06/2023
ठिकाण :- हिंगणघाट

उपविभागीय दंडाधिकारी हिंगणघाट

(शिल्पा सोनाले)
उपविभागीय दंडाधिकारी तथा
अध्यक्ष पोलीस पाटील
पद भरती प्रकीया समिती – 2023
हिंगणघाट

**प्रतिलिपी :-** माहिती व आवश्यक कार्यवाहीस सादर/ अग्रेषीत.

1) मा. जिल्हादंडाधिकारी, वर्धा
2) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, वर्धा
3) उपविभागीय पोलीस अधिकारी, **हिंगणघाट/वर्धा/ पुलगांव (सदस्य)**
4) जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा
   सदर आरक्षणाचा जाहिरात स्थानिक दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन प्रसिध्द केल्याबाबतचे कात्रण या कार्यालयास सादर करणेची दक्षता घ्यावी.
5) तालुका दंडाधिकारी , हिंगणघाट / समुद्रपुर
6) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगणघाट / समुद्रपुर
   **तालुका दंडाधिकारी व गटविकास अधिकारी** यांनी सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सूचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द अहवाल सादर करणेची दक्षता घ्यावी.
   तसेच आपले अधिनस्त संबंधित गावाचे तलाठी व ग्रामसेवक यांना त्यांचे कार्यालयाचे सुचना फलकावर जाहिरात दर्शनी भागात प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्याचे **निर्देश आपले स्तरावरुन देण्यात यावे.**
7) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, **हिंगणघाट/वडनेर/अल्लीपूर/समुद्रपुर/ गिरड/दहेगांव/सिंदी रेल्वे** सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करणेची दक्षता घ्यावी.
8) शिपाई, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय **हिंगणघाट** यांना सुचित करणेत येते की, सदरची जाहिरात उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, हिंगणघाट चे सुचना फलकांवर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल सादर करणेची दक्षता घ्यावी.

उपविभागीय दंडाधिकारी तथा
अध्यक्ष पोलीस पाटील
पद भरती प्रकीया समिती – २०२३
हिंगणघाट



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner